

# चहा, भाजीचा व्यापार!

(भाग ५)

## उरलंसुरलं वाद्यही गहाण

रायकरच्या खोलीत आल्यापासून पोट भरण्याचे चढ-उतार होतच होते; पण परिस्थिती त्या आधीपेक्षा बरी होती. आता पुन्हा पूर्वीची परिस्थिती येऊ पाहात होती. शेवटी मनाचा निग्रह केला. आता माझ्याजवळ एकुलतं एक वाद्य शिल्लक राहिलं होतं - हार्मोनियम. ते उचललं आणि मुगभाटातल्या एका मारवाड्याच्या दुकानात गेलो. गहाण ठेवलं. पंधरा रुपये मिळाले. मुदत तीन महिने, काही बोललो नाही. मुकाट्यानं पैसे घेतले. खोलीवर आलो. वरून शांत दिसत होतो. पण आतून दु:खाचे कढ येत होते. गाण्यासाठी लागणारा शेवटचा आधार मी पोट जाळण्यासाठी स्वत:च्या हातांनी

विसर्जित केला होता. ती पेटी मला कधीच परत मिळणार नव्हती. मी मिळवू शकणार नव्हतो!

रायकरचं कार्यक्षेत्र बरंच वाढलं होतं. तो दरवर्षी मेळा काढत असे. त्या वर्षीचा गणेशोत्सव जवळ येऊ लागला, तेव्हा त्यानं मेळ्याची तयारी सुरू केली. त्या मेळ्याचा संगीत-दिग्दर्शक अर्थातच मी होतो. त्या वर्षीचा मेळा छान झाला. त्यापूर्वीचेही चांगलेच असले पाहिजेत. पण मी ते पाहिलेले नव्हते. आमचा हा मेळा त्या वर्षी खूप गाजला. रायकर खरोखरीच चांगला कवी होता. त्यामुळे त्याची माझी भट्टी जमून गेली होती. मेळ्यासाठी चाली लावायला माझ्याकडे पेटी नव्हती. ती कुठं गेली, ते मी रायकरला सांगितलं नाही. रायकरनं दुसरी एक पेटी कुठूनतरी आणली.

माझं कवितांना, पदांना चाली लावण्याचं काम चालू असतानाच एक कविता वासू मेहेंदळेनं समोर केली. कविता वाचताच एकदम मी म्हटलं, ''वा! - फार छान कविता आहे! कुणी लिहिलीय?'' कवितेखाली नाव होतं, 'अकिंचन.' त्यामुळे कर्त्याचा शोध लागत नव्हता. मेहेंदळे म्हणाला, ''मीच लिहिलीय.'' मला आश्चर्य वाटलं, पण थोडा विचार केल्यावर ते आश्चर्य नाहीसं झालं. त्याच्या परिस्थितीत असलेल्या जिवाचा आरसाच जणू, अशी ती कविता होती. माझ्याकडे अजूनही ती कविता आहे. त्यानंच 'अकिंचन' हे नाव घेतलं होतं. तेव्हापासून आजपर्यंत तो 'अकिंचन' या नावानंच लिहितो.

'विचित्र विश्व' या मराठीतल्या उद्बोधक व मनोरंजक मासिकाच्या प्रत्येक अंकातली सुरुवात 'अकिंचना'च्या लेखानंच होते. त्याचंच ते मासिक आहे. त्याचा संपादक वासू मेहेंदळे तो हाच! 'रम्यकथा प्रकाशन' या नावानं त्याचा प्रकाशन-व्यवसाय गेली कित्येक वर्षं पुण्यात दिमाखानं उभा आहे. लक्षावधी रुपयांचा व्यवहार करणारा हा आजचा वा. ग. मेहेंदळे अजूनही 'अकिंचन' हेच नाव अभिमानानं लावतो. ज्यावेळी त्याची कविता मी प्रथम पाहिली, त्यावेळी तो खरोखरच अकिंचन होता. हॉटेलात टेबलं पुसून आणि कपबशा विसळून आपली भूक भागवत होता. कुणाला नकळत माझ्यासाठी एखादा पाव आणीत होता.

रायकरच्या खोलीची आणि स्वत: रायकरची किमया अशी विलक्षण की, त्या खोलीत त्याकाळी राहात असलेल्या सगळ्या गणंगांनी पुढे उत्तम स्थिती प्राप्त करून घेतली. युद्धकाळात गाडगीळ आणि झाडकर विमानदलात गेले. झाडकर पुढं 'बी.ओ. ए.सी.' या ब्रिटिश विमान कंपनीत ग्राउंड इंजिनिअर होता. 'कॉमेट' विमानाच्या पहिल्या अपघातानंतर स्वत: संशोधन करून त्या अपघातामागचं तांत्रिक कारण त्यानं शोधून काढलं. ते तंतोतंत मान्य करून 'बी.ओ.ए.सी.'नं त्याला दोन सहस्र पौंडांचं बक्षीस दिलं! कलकत्त्याला त्याचं मोटार स्पेअर पार्ट्सचं दुकान होतं. मोटारसायकल रेसेसमध्ये त्यानं अनेक पारितोषिकं मिळवली आहेत. नागपूरला त्याची स्वत:ची मोठी इमारत आहे. गाडगीळ महायुद्धात ग्राउंड इंजिनिअर होता. नंतर त्याचं स्वत:चं नागपूरला औषधाचं दुकान होतं. त्याच्या पत्नी नामवंत डॉक्टर आहेत. अंबादास नखातेचं

नागपूरला मोठं किराणाभुसार मालाचं दुकान आहे. स्वत:चं घर आहे. पिंपुटकरचं पुण्यात स्वत:चं घर आहे. घरं बांधण्याचा त्याचा व्यवसाय उत्तम चालू होता. बाबू पाठक एस.टी.त इंजिनियर होता. दापोडी वर्कशॉपमध्ये मोठा अधिकारी होता. रायकर तर त्याच्या वैद्यकीय ज्ञानामुळे आणि सार्वजनिक कार्यामुळे महाराष्ट्रातच काय, पण अन्य प्रांतांतही विख्यात झाला आहे. त्यानं १९३७-३८ पासून सुरू केलेल्या कार्याला 'शुभंकरोति'च्या रूपानं अत्यंत गौरवशाली स्वरूप आता प्राप्त झालं आहे. अनेक तरुण० तरुणी स्वत:च्या सुखी संसाराचं श्रेय मुक्त कंठानं आणि भरल्या अंत:करणानं त्याला आणि त्याच्या पत्नीला देत आहेत. धोंडू कुलकर्णी आज देशातल्या एक ख्यातनाम गायिका झाल्या आहेत.

असे आम्ही सारे त्या २१७, क्राऊन बिल्डिंगमधल्या रायकरच्या खोलीत १९३९ मध्ये कसेबसे जगत होतो. हार्मोनियम गहाण ठेवून आलेल्या पंधरा रुपयांची ऊब मला काही दिवस पुरली. मध्यंतरी लागलेली दोन वेळ जेवणाची सवय आता नडू लागली. त्यामुळे पंधरा रुपये पुरण्याची मर्यादा कमी झाली.

**माझंही युद्ध सुरू**

पण त्याच वेळेला एक सुवर्णसंधी चालून आली. माझ्या गाण्याची माहिती बऱ्याच लोकांना होती. गजानन वाघच्या 'विझलेली वात' या नाटकाच्या संगीत-दिग्दर्शनाच्या वेळी एका गाण्याला सौ. हिराबाई जव्हेरींनी चाल लावली होती. त्या निमित्तानं मी त्या वेळी त्यांच्याकडे जात होतो. माझं गाणंही त्यांनी ऐकलं होतं. त्यांच्याच 'स्वामी समर्थ गायन वादन विद्यालया'त त्या वेळी 'ओडियन' या प्रसिद्ध ग्रामोफोन रेकॉर्डिंग कंपनीच्या रेकॉर्डिंगसाठी तयार करायच्या गाण्यांच्या तालमी चालल्या होत्या. त्यांनी माझं नाव त्यावेळचे त्या कंपनीचे एक प्रमुख श्री. आर. बी. रेळे यांना सांगितलं. त्यांनी माझा पत्ता काढून मला बोलावलं. माझं गाणं ऐकून ते खरोखरीच खूष झाले. आजचे ख्यातनाम संगीत-दिग्दर्शक श्री. दत्ता डावजेकर 'ओडियन'साठी काही गाण्यांना चाली लावत होते. श्री. रेळे यांनी त्यांनाच माझ्यासाठी दोन चाली करायला सांगितलं. डावजेकरांनी छान चाली केल्या. त्यांच्याकडून मी त्या शिकू लागलो.

आणखी एक आगळी आणि मला अभिमानाची अशी गोष्ट त्या वेळी घडली. माझं गाणं श्री. रेळ्यांनी ऐकलं, तेव्हा माझ्या गळ्यात बालगंधर्वांचा बाज पुरेपूर उतरला आहे, याची कल्पना त्यांना आली. त्यांनी एक धाडसी निर्णय घेतला. बालगंधर्वांची काही लोकप्रिय गाणी त्यांनी माझ्या आवाजात रेकॉर्ड करायचं ठरवलं. ही कल्पना त्यांनी मला सांगितली, तेव्हा माझं सर्वांग अक्षरश: मोहरून उठलं. एकलव्यासारखं गुरुस्थानी मानून ज्यांच्या गायनशैलीचा मी ध्यास घेऊन अभ्यास केला, त्या साक्षात देवगंधर्वांनी गायलेली 'असामान्य, अलौकिक' असली विशेषणं कमीच पडतील, अशी गाणी माझ्या गळ्यातून रेकॉर्ड होणार, माझ्या तपस्येचं सार्थक होणार, हे ऐकून मला केवढा आनंद झाला असेल, त्याची कल्पना केवळ मीच करू शकतो. गाण्यांच्या

तालमी जोरात सुरू झाल्या. हार्मोनियमचे पंधरा रुपये नुकतेच मिळाले होते. त्यामुळे भरपूर खात होतो. अंगात थोडीफार शक्ती आणायचा प्रयत्न करीत होतो. माझ्या रेकॉर्ड्स होणार. 'ओडियन'सारखी प्रसिद्ध कंपनी त्या करणार, रेकॉर्ड खपण्याची खात्री असल्याशिवाय काही रेकॉर्ड्स काढायच्या भानगडीत ते पडणार नाहीत. तेव्हा रेकॉर्ड्स खपणार आणि मग पुढं.... माझं मनातल्या मनात मनोरे बांधणं सुरू झालं. १९३०-३१ साली हुकलेली, 'मी कदाचित त्या लहान वयात शेफारून जाईन', म्हणून माझ्यापासून दूर सारण्यात आलेली संधी आता पुन्हा आपणहून चालत आली होती. या वेळी ती हिरावून घ्यायला कोणी आड येणार नव्हतं. श्री. रेळे, श्री. डावजेकर, सौ. श्यामला माजगावकर, सौ. हिराबाई जव्हेरी सारेच माझ्या गाण्यावर प्रसन्न होते. पण हे सारं सुरळीत असूनही नियतीनं माझ्यावर पुन्हा एक प्रचंड घाला घातला.

दुसऱ्या महायुद्धाचे ढग जमू लागले होते. इंग्लंड पूर्ण निर्धारानं जर्मनीच्या विरुद्ध उभा राहिला होता. 'ओडियन' ही जर्मन कंपनी होती. जर्मनीचे हिंदुस्थानातले सारे व्यवहार त्या वेळच्या ब्रिटिश सरकारनं ताब्यात घ्यायला सुरुवात केली. त्या सत्रात 'ओडियन' कंपनीही सापडली. त्यांचे सर्व व्यवहार सरकारनं बंद करून टाकले.

माझं रेकॉर्डिंग तसंच राहिलं. पहिल्या वेळी लहान वयामुळे मी शेफारून जाण्याची संभाव्यता आड आली आणि आता प्रत्यक्ष हिटलर आणि ब्रिटिश सरकार या दोघांनी मिळून माझा धुव्वा उडवला. युद्ध महिना-पंधरा दिवस पुढं सुरू झालं असतं, तर काय बिघडलं असतं? किंवा रेळ्यांना माझा पत्ता एक-दोन महिने अगोदर लागला असता तर?

तीनचार दिवस मी माणसांत नव्हतो. पेटी गहाण टाकून घेतलेल्या पंधरा रुपयांनी प्रयत्नपूर्वक मिळवलेली शक्ती आता पूर्णपणे खचली. त्या तीनचार दिवसांत मी म्हातारा दिसायला लागलो. सरळ उभं राहता येईना. सारं अंग थरथर कापायला लागलं. रायकर घाबरून गेला. तो चांगला वैद्य होता. रोगाचं निदान आणि त्याची चिकित्सा करण्यामध्ये तो प्रवीण होता. त्यासाठी तो प्रसिद्ध होता. त्यानं मला तपासलं आणि शांतपणानं सांगितलं, "सुधीर, तू ताबडतोब मुंबई सोड. तू फार ॲनिमिक झाला आहेस. क्षयाच्या पहिल्या अवस्थेपर्यंत पोचायच्या बेतात तुझी प्रकृती आहे. तू इथंच आणि असाच राहिलास तर टी.बी. होऊन मरशील!"

त्याचं निदान आणि त्यावरची उपाययोजना अगदी बरोबर होती. पण मुंबई सोडून जायचं, म्हणजे कुठं जायचं? कोल्हापूर, मिरज, जमखंडी... सगळं मला बंद होतं. मग जायचं कुठं? आणि करायचं काय?

त्यावर रायकरनं उपाय सुचवला. तो म्हणाला, "मी पूर्वी कीर्तन करायचा. कुठल्याही गावात जाऊन तिथल्या देवळात पाटी लावायचा - 'डॉ. वैद्यकुमार रायकरांचं आज संध्याकाळी (किंवा रात्री) अमक्या अमक्या विषयावर कीर्तन आहे.' देवळाला भाडं द्यावं लागत नसे. कीर्तनाला आलेले लोक बुवांच्या पुढं तांदूळ, केळी, क्वचित नारळ आणि पैसे ठेवतात. शेवटी ते गोळा करायचे. झकास पोट भागतं. तिथून पुढच्या गावी

जायचं. तुलासुद्धा हा प्रयोग करता येईल. कुठल्याही गावी जायचं, गावातल्या प्रतिष्ठित लोकांना भेटायचं, मी गाणारा आहे, माझी एखादी गाण्याची बैठक करता का म्हणून विचारायचं, त्यांच्या गळ्यात पडायचं, ते देतील ते पैसे घ्यायचे, पुढच्या गावी जायचं. अरे, अनोळखी गावी भीक मागायला कमी लाज वाटते."

रायकरचा हा सल्ला नवीन होता, गंभीरपणानं विचार करण्यासारखा होता. मला तो पटला. मी त्याचप्रमाणं करायचं ठरवलं. मला एका योगायोगाचं आश्चर्य वाटलं. लहानपणी डॉ. भाजेकरांच्या घरी राहात असलेल्या मधू आपटे, दत्तू करमरकर आणि मी अशा तिघांनी सायकलवरून साऱ्या हिंदुस्थानचा प्रवास करायचं ठरवलं होतं. त्याचा दिनांकही त्या वेळी नक्की केला होता. 'नाइन्टीन फॉर्टी, फेब्रुवारी सेकंड.'

दोन फेब्रुवारी १९४०. दोन फेब्रुवारीच का, याला मधूनं एक गमतशीर कारण सांगितलं होतं. १९४० हे ठीक. पण जानेवारी म्हणजे पहिला महिना ठरवला आणि त्या वेळी निघता आलं नाही, तर सारं वर्ष वाईट जाईल, म्हणून पहिला महिना नको. त्यापेक्षा फेब्रुवारी बरा. आणि पहिल्या दिनांकाला निघायचं, असं ठरवून काही घोटाळा झाला, तर पहिल्या दिवशीच अपशकुन झाला, असं नाही का होणार? त्यापेक्षा दोन फेब्रुवारी १९४० बरं. तेव्हापासून म्हणजे १९३२ सालापासून 'नाइन्टीन फॉर्टी-फेब्रुवारी सेकंड' हे मला तोंडपाठ होतं! (अजूनही आहे!)

रायकरनं हा विचार सांगितला, तो ऑगस्ट महिन्याचा शेवट होता. मी लगेच तो अमलात आणायचं ठरवलं. कुठं जायचं, हा प्रश्न होता. कोल्हापूर, मिरज, जमखंडी, म्हणजेच दक्षिण मला बंद होती. राहिली उत्तर. तीच दिशा मनाशी ठरवली. दोन रुपये उसने घेतले. एका पिशवीत कपडे घातले आणि १९३२ साली ठरवलेल्या दिवशीच्या आधी बरोबर पाच महिने एक दिवस मी मुंबईच्या बाहेर पडायचं ठरवलं.

**अज्ञातात उडी**

मी मुंबई सोडणार, त्याच दिवशी सकाळी नाना माझ्याकडे आला. त्या दिवशी त्याचं स्वतंत्र बिऱ्हाड लागायचं होतं. आमची वहिनी त्या दिवशी येणार होती. नानानं स्वत:ची जागा ठाकुरद्वारालाच कामत चाळीत घेतली होती. मी वहिनींना पाहिलेलं नव्हतं. माझ्या मामेभावाच्या मुंजीतच मामांनी नानाचं लग्न करून टाकलं होतं. दोन्ही कार्यांसाठी मला जमखिंडीला घेऊन यायला मामांनी मुद्दाम नानाला सांगितलं होतं. नाना मला आग्रह करून गेला, पण मी गेलो नाही. कारण माझी काही चूक नसताना केवळ मी वस्तुस्थिती सांगू शकलो नाही, म्हणून तिथं मला सगळ्यांमध्ये खाली मान घालून वावरावं लागलं असतं.

मी नानाच्या नव्या घरी गेलो. वहिनींना पाहिलं. त्यांचं नवं घर लावायला मदत केली. नानाला आणि वहिनींना नमस्कार केला. पुन्हा त्यांचं दर्शन मी घेऊ शकणार होतो किंवा नाही, ते माहीत नव्हतं!

१ सप्टेंबर १९३९ हाच तो दिवस. याच दिवशी हिटलरनं पोलंडवर स्वारी केली

आणि खऱ्या अर्थानं दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाली. मीही आता जीवन-मरणाच्या नव्या लढाईवर निघालो. मुंबईच्या रणक्षेत्रावर ही लढाई लढली गेली. पावणेतीन वर्षं मी लढत होतो. या लढाईसाठी कोल्हापुरातून मुंबईला आलो, तेव्हा पेटी-तबला-तंबोरा-व्हायोलिन ही हत्यारं माझ्याजवळ होती. थोडाबहुत उत्साह होता. गोपाळराव येरकुंटवारांसारख्यांचा आणि संघाचा आधार होता. सुरुवातीला काही काळ ही लढाई मी जिंकणार, असं वाटत होतं. पण हळूहळू यांतलं एक एक शस्त्र गळून पडू लागलं. सारे आधार नष्ट झाले. माझा पूर्ण पराभव झाला.

आता मुंबई सोडून नव्या अपरिचित रणक्षेत्रावर मी पाऊल टाकत होतो. शस्त्रविहीन - आधारहीन अवस्थेत आणि कमालीच्या शारीरिक दुर्बलतेत ही लढाई मला लढायची होती. माझ्या सभोवती होता, निरुत्साही भयाण अंधकार!

मुंबईचं रणक्षेत्र माझ्या पूर्वपरिचयाचं होतं. आता मी उडी घेणार होतो अज्ञातात.

– कै. सुधीर फडके

(श्री. श्रीधर फडके यांच्या परवानगीने 'जगाच्या पाठीवर' या आत्मचरित्रातून क्रमशः)